**B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION**
SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

**PERIODIC TEST-01(2025-26)**
**MARATHI**

Class : X | Duration : **1** Hrs
Date : 30.06.2025 | Max. Marks : **25**
Admission No.: | Roll No.:

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

(1) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग – अ (वाचन व आकलन )

**प्रश्न 1 :– (आकलन ) अपठित गद्यांश :–** **(5X1=5)**

कुठलाही ऋतू हा निसर्गाचा सोहळाच असतो.खेडयांमध्ये लहान गावांमध्ये ऋतूपालट लगेच कळतो.आमच्या लहानपणी ऋतूंची छान सरमिसळ असायची,इंद्रधनुष्याचे रंग जसे एकमेकांत मिसळलेले असतात तशी पाऊस संपला की त्यातला हुरहुरता ओलावा घेऊन शरदाचे चांदणे फुलायचे दवात भिजलेली पहाट पांघरूनच दिवाळी सरायची.त्या दवबिंदूची शिरशिरी हवीहवीशी वाटत असतानाच थंडीचा काटा बोचायला लागला की,कळायचे हेमंत वारे वाहू लागले.थंडीचा हा गारठून टाकणारा अनुभव माघापर्यंत पुरवायचा आणि शिशिराने गिरकी घेतली की वसंताची कळी खुलायची फाल्गुनी हवेत रंगांची उधळण व्हायची.खरंतर संक्रातीपासून एक गंध भुरळ घालायचा.तो म्हणजे आम्रमोहराचा गंध!मोहराने डवरलेली आंब्याची झाडं आणि त्यावर चालणारे कोकिळकुंजन ही देखील ऋतुबदलाचीच नांदीच!धगधगत्या ग्रीष्माआधीचा हा वसंत मला सर्वाधिक आवडतो.वसंत म्हणजे गंधवतीच्या सर्जनावा बहर.गंधवती म्हणजे पृथ्वी,आपली काळी आई आणि सर्जन म्हणजे निर्मिती.भरभरून देणे हा काळया मातीचा गुणधर्म आहे.शेतातील तऱ्हेतऱ्हेची पिकं असोत की,वेगवेगळया चवीची मोसमी फळं,फुलांचे गंधमधुर ताटवे असोत की,रूचिरभिन्न मसाल्याच्या वनस्पती, एकाच काळया मातीतून निसर्ग ही किमया घडवत असतो.सुगीचे दिवस आणि फाल्गुनातील उल्हास यामुळे या दिवसात मन वाऱ्यावर लहरत असतं––पतंगासारखं!

**(अ) दिलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा:–**

1 फाल्गुनी हवेत कशाची उधळण व्हायची ?

**अ** गंधाची | **ब** रंगांची
**क** फुलांची | **ड** विचारांची

2 शिशिराने गिरकी घेतली की कोणाची कळी फुलायची?

**अ** वैशाखाची | **ब** ग्रीष्माची
**क** वसंताची | **ड** हेमंतीची

**(आ) उताऱ्याच्या आधारे पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा:–**

1 गंधवती म्हणजे काय ?

2 सर्जन या शब्दाचा अर्थ काय?

3 काळया मातीचा गुणधर्म कोणता ?

## विभाग– ब ( व्याकरण )

**प्रश्न 2 खालील वाक्यांचे प्रकार ओळखा –** **(3X1=3)**

1 नेहमी नम्रपणे बोला.

2 किती गोड आहे तुझा आवाज!

3 तुम्ही वेळेचा अपव्यय का करता ?

**प्रश्न 3 काळ ओळखा :–** **(2X1=2)**

1 पावसात खेळताना मजा येते.

2 मोनिका पत्र लिहित होती.

**प्रश्न 4 लिंग बदला :–** **(2X1=2)**

1 अध्यक्ष

2 कवी

**प्रश्न 5 खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करुन पुन्हा लिहाः–** **(2X1=2)**

(मळमळ व्यक्त करणे,झोकून देणे )

1 सामाजिक कार्यामध्ये सर्वांनी सहभागी झाले पाहिजे.

2 सहलीचा बेत रद्द होताच सर्व विदयार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली.

**विभाग (क) पाठ्पुस्तकावर आधारित**

**प्रश्न 6ः– खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहाः– ( कोणतेही दोन )** **(2X3=6)**

1 दोरीवरच्या उडया मारण्याच्या प्रसंगातील तुम्हाला समजलेला विनोद स्पष्ट करा?

2 दुसऱ्या अनुभवातून काकोडकर काय शिकले?

3 दुयऱ्या दिवशी पंतांचा व्रतभंग कसा झाला?

**विभाग ड ( लेखन )**

**प्र 7 खालील मुद्दयाच्या आधारे गोष्ट लिहून शीर्षक व तात्पर्य लिहा :–** **1X5=5**

**मुद्देः–** जंगलाचा राजा सिंह –––– अतिशय गर्विष्ठ –––– इतर प्राणी घाबरत ––– सिंह रात्री ओरडून आवाज करू लागला –––––गवतावर झोपलेल्या गांधीन माशीची झोपमोड ––––––––– ती चिडली –––––– सिंहाला युध्दाचे आव्हान –––––– त्याच्या कानात गेली ––––––– सिंह असहाय्य सिंहाचे गर्वहरण –– तात्पर्य .

**::::::::::::::::::::: समाप्त ::::::::::::::::::::::::::**